मुंबई ■ सांगली ■ कोल्हापूर ■ नवे विचार...नवी सुरुवात ■ RNI NO. MAHMAR/2020/79996

दैनिक
# हॅलो प्रभात

■ मुख्य संपादक : गणेश पाटील (सावर्डेकर) Mo. 9011889001

■ सांगली ■ कोल्हापूर ■ सातारा ■ पुणे ■ अहिल्यानगर ■ वर्ष : ६ ■ अंक : १५७ ■ मंगळवार, ०९ सप्टेंबर २०२५ ■ किंमत : ३ रुपये ■ पाने : ४




तुमचं वृत्तपत्र आता तुमच्या मोबाईलवर!
खालील QR कोड स्कॅन करा आणि आजच्या e-paper वाचा.
हॅलो प्रभात
सोबत वाचनाचा नवा डिजिटल अनुभव
सहज, जलद आणि स्मार्ट!

# बाप्पा गेले... आता प्रतिक्षा दिवाळीची

## राजकारणाचं भूत... इच्छुकांच्या तिजोऱ्या रिकाम्या



**सांगली : विशेष प्रतिनिधी**

गणपती बाप्पांकडून पुढच्या वर्षी येण्याचं आश्वासन घेऊन बाप्पांना जल्लोषात निरोप देण्यात आला. यंदा गणेशोत्सव सोहळा आणि दिवाळी निवडणुकांच्या आधी आल्या आहेत. त्यामुळेच राजकारणाच्या रिंगणात उतरण्याची तयारी केलेल्या महारथींच्या पळवाटा बंद झाल्या होत्या.

स्थानिकस्वराज्यसंस्थांच्यामहापालिका, जिल्हा परिषद, नगरपालिका, पंचायत समिती इच्छुक असलेल्या भावी राजकारण्यांचे फोटो चौका-चौकात गणेशोत्सव सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर उभारण्यात आलेल्या कमानीवर झळकत होते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे प्रकरण सर्वोच्च न्यायालय होते. त्यामुळे निवडणुका कधी लागणार याचा काहीच अंदाज कुणालाच नव्हता. त्याच धांदलीत गेला गणेशोत्सव सोहळा आणि दिवाळी कशी गेली हे कुणालाच कळले नाही. काहीजणांनी निवडणुका लगेच लागतील म्हणून पावत्याही गेल्या वर्षी फाडल्या. पण निवडणुका लागल्याच नाहीत. यावेळी मात्र स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या अगोदर गणेशोत्सव सोहळा आणि दिवाळी आल्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये मात्र आनंद आणि जल्लोष होता.

गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी हेच उद्या आपले मतदार आणि आणि प्रचारक असल्याचे माहित असल्यामुळेच गुडघ्याला बाशिंग बांधून राजकारणाच्या आखाड्यात उतरलेल्या राजकारण्यांना गणेशोत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना नाराज करणे परवडणारे नव्हते. त्यामुळेच यंदाच्या निवडणूक रिंगणात उतरण्याची तयारी केलेले अनेक नवे चेहरे स्वागत कमानीवर आल्याचे दिसून आले. तसेच राज्यपातळीवरील



नेत्यांनीदेखील शहरी भागातील प्रत्येक कमानीवर आपला फोटो झळकेल याची दक्षता घेतली. गणेशोत्सव मंडळांच्या पदाधीकार्यांमध्ये त्या दृष्टिकोनातूनच असा गणेशोत्सव सोहळा कधी झालाच नसल्याचे बोलले जात आहे. सणासुदीला गाव सोडणारे गाव पुढारी यंदाच्या गणेशोत्सव सोहळ्यामध्ये गावातच तळ ठोकून होते. मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना चहापाणी करून पावत्या फाडत होते, तोंडावर हसू होते. निवडणुकीचा हा परिणाम आहे हे मंडळाचे कार्यकर्ते देखील चांगल्या रीतीने ओळखून असल्यामुळे पावत्या जरा ताकतीनेच फाढल्या जातील याची मंडळांच्या तरुणांनी दक्षता घेतली. सोसवत नसले तरी नेत्यांच्या तोंडावर हसू होते, आणखी काही लागलं तर मला सांगा असा शब्दही दिला जात होता. यंदाचा गणेशोत्सव सोहळा जल्लोषात पार पडला, विसर्जनाला डॉल्बीचा दणदणीत सुरुच होता. त्याच बरोबर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या रिंगणात उतरण्यासाठी गुढग्यास बाशिंग बांधून तयार असलेल्या कार्यकर्त्यांची स्वागतमंचावर उपस्थिती देखील लक्षणीय होती. चौका - चौकात गणेश मंडळांचे स्वागत करण्यासाठी स्वागतमंच उभारण्यात आले होते. गेल्या गणेशोत्सव सोहळ्याच्या



तुलनेत यावेळी स्वागतमंत्त्यांची संख्या अधिक होती. जुन्या जाणत्या राजकारण्यांबरोबर उगवते पुढारीदेखील मोठ्या संख्येने उपस्थित असल्याचे जाणवले.

गणेशोत्सव सोहळा पार पडला. आता दिवाळी तोंडावर आली आहे. दिवाळीच्या कल्पनेने नेत्यांचे प्राण कंठाशी आले आहेत, अद्याप स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तारखा देखील जाहिर झालेल्या नाहीत. निवडणूक प्रचार आणि त्यासाठी होणारा खर्च याचे गणित कसे घालायचे हाच प्रश्न इच्छुक उमेदवारांसमोर उभा असताना दिवाळीचा खर्च निवडणुकीचा मतदारांना दिलेला बोनस समाजाचा का? अशी चर्चा मात्र आता जोरदारपणे चालू आहे.

# संक्षिप्त...

### तुळजापुरात भवानीमातेची १४ सप्टेंबरपासून मोहनिद्रा

**तुळजापूर : हॅलो प्रभात**

श्री तुळजाभवानी मातेचा शारदीय नवरात्रौत्सव नऊऐवजी दहा दिवस यंदा साजरा होत असून, या उत्सवातील मुख्य बदल म्हणजे घटाला दहा माळा चढवून अकराव्या दिवशी विजयादशमी (दसरा) साजरी होत आहे. नवरात्र महोत्सवात यावर्षी तिसरी माळ २४ व २५ सप्टेंबरला दोनदा आल्याने विजयादशमी (दसरा) गुरुवारी २ ऑक्टोबरला साजरा होत आहे.

### गणेशोत्सवात जल्लोष विसर्जनानंतर गळफास

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

आठ दिवस सकाळ-सायंकाळ मंडळाच्या गणरायाची नित्य पूजा-अर्चा अन् विसर्जन मिरवणुकीत शनिवारी दिवसभर जल्लोष केलेल्या चाफोडी तर्फ तारळे खुर्द ( ता. राधानगरी) येथील चौदा वर्षीय शाळकरी मुलाने रविवारी सकाळी राहत्या घरात गळफास घेऊन जीवन संपविले. करण कृष्णात गायकवाड असे त्याचे नाव आहे. मुलाने टोकाचे पाऊल उचलल्याने शेतकरी बापाचा आक्रोश मन हेलावणारा होता.

### पहिला क्रमांक पटकावणाऱ्या अश्विनीची मृत्यूशी झुंज अपयशी

**खेड : हॅलो प्रभात**

खेड तालुक्यातील अश्विनी केदारी (वय ३०) हिने २०२३ च्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पोलिस उपनिरीक्षक परीक्षेत मुलींमध्ये संपूर्ण राज्यात पहिली येण्याचा मान मिळवला होता. २८ ऑगस्ट २०२५ रोजी पहाटे हिटरमुळे झालेल्या अपघातात तिच्या अंगावर उकळते पाणी सांडले आणि ती ८० टक्के भाजली. रुग्णालयात तिच्यावर उपचार सुरू होते. मृत्यूशी झुंज देणाऱ्या मुलीने दि. ०८ सप्टेंबर रोजी अखेरचा श्वास घेतला.

### मोकाट कुत्र्यांचा धुमाकूळ १२ जणांवर हल्ला

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

कोल्हापूर शहर, परिसरात मोकाट कुत्र्यांच्या झुंडीने अक्षरश: धुमाकूळ घातला आहे. दिवसभरात कुत्र्यांनी हल्ला करून दोन लहान मुलांसह १२ जणांना गंभीर जखमी केले. शिरोली येथील एका ४२ वर्षीय व्यावसायिकाचा रेबिजमुळे रविवारी दुपारी मृत्यू झाला. शासकीय रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते.

### कोल्हापूर जिल्ह्यात २०१ मंडळांवर खटले

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

ध्वनी मर्यादेचे उल्लंघन केल्याप्रकरणी शहर, जिल्ह्यातील २०१ गणेशोत्सव मंडळांचे पदाधिकारी, साऊंड सिस्टीम मालक आणि ट्रॅक्टर चालकाविरुद्ध थेट न्यायालयात खटले दाखल करण्यात आले आहेत.

## नवकृष्णा व्हॅली स्कूलमध्ये शिक्षक दिन उत्साहात

**कुपवाड : हॅलो प्रभात**

सुरज फाउंडेशनच्या नवकृष्णा व्हॅली स्कूल मध्ये शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने आणि त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून झाली. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून एसएससी बोर्डाचे



माजी विभागीय सचिव मा. डी. एस. पोवार, सुरज फाउंडेशनचे ट्रस्टी प्रवीण लुंकड, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अनिल देवधर, मिरा देवधर, राजीव करंदीकर, बजरंग पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.


यावेळी डॉ. राधाकृष्णन यांच्या कार्याचा गौरव करताना शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. डी.पोवार यांनी सांगितले की, शिक्षक म्हणजे केवळ धडा शिकवणारा व्यक्ती नसून तो विद्यार्थ्यांच्या जीवनाचा खरा शिल्पकार असतो. मुलांमधील गुणवत्ता ओळखून योग्य मार्ग दाखवणारा तोच शिक्षक. चांगला शिक्षक विद्यार्थ्याला परीक्षेत नव्हे तर यशस्वी होण्यासाठी तयार करतो. यावेळी संगीता पागणीस रघुनाथ सातपुते, अधिकराव पवार, प्रशांत चव्हाण, राजेंद्र पाचोरे, श्रीशैल मोट्गी, प्रदीप पाटील, विनायक जोशी यांच्यासह शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## दूध उत्पादकांच्या विश्वासावर 'गोकुळ'ची भरारी : नाविद मुश्रीफ

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ (गोकुळ) हा राज्यातील आदर्श दूध संघ ठरला असून, उत्पादकांच्या हितासाठी यंदा अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत.

गाय-म्हैस दूध दरात प्रतिलिटर १ रुपया वाढ, जातिवंत म्हैस खरेदी अनुदान ५० हजार रुपये, इमारत अनुदान वाढ, वासरू संगोपन योजनेत वाढ, तसेच मिनरल मिक्स्चर ५०%



सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यात आले आहे. संघाने २०२५ हे वर्ष 'युवा दूध उत्पादक वर्ष' म्हणून घोषित केले असून, युवकांना दुग्धव्यवसायाकडे आकर्षित करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. करमाळा येथील सौर प्रकल्पामुळे दरवर्षी ७-८ कोटींची बचत होणार असून, आर्थिक स्थैर्य अधिक बळकट होईल. भविष्यात गोकुळ चीज, आईसक्रिम आदी उत्पादन बाजारात आणण्याबरोबरच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत दुग्धजन्य पदार्थ विक्रीसाठी संघ तयारी करत आहे. गोकुळची ६३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ९ सप्टेंबर रोजी श्री महालक्ष्मी पशुखाद्य कारखाना, कागल येथे होणार आहे. या सभेत वार्षिक अहवाल, अंदाजपत्रक व उत्पादक हिताचे नवे निर्णय जाहीर केले जाणार असल्याचे चेअरमन नविद मुश्रीफ यांनी सांगितले.

# काँग्रेसचा इतिहासच ओबीसींच्या विश्वासघाताचा

### भाजपा मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांचा घणाघात

**मुंबई : हॅलो प्रभात**

ओबीसी समाजाची बाजू घेण्याचा आव आणणाऱ्या काँग्रेसचा इतिहास ओबीसी समाजाच्या विश्वासघाताने बरबटलेला आहे. मंडल आयोगाचा आणि त्यापूर्वी काका कालेलकर आयोगाचा ओबीसी समाजाच्या आरक्षणासाठीचा अहवाल काँग्रेसच्या सरकारांनी कुजवून टाकला, असा घणाघात भारतीय जनता पार्टीचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी सोमवारी केला. भाजपा प्रदेश कार्यालयात पत्रकारांशी बोलताना श्री. उपाध्ये यांनी काँग्रेसच्या ओबीसी विरोधी चेहऱ्याचा पर्दाफाश केला.

यावेळी राष्ट्रीय प्रवक्ते जफर इस्लाम, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, प्रदेश प्रवक्ते ओमप्रकाश चौहान उपस्थित होते. ओबीसी समाजाच्या कल्याणाला विरोध करणारे काँग्रेसचे राहुल गांधी, विजय वडेट्टीवार यांच्यासारखे नेते आज ओबीसी समाजाला भडकवण्याचे पाप करीत आहेत असेही श्री. उपाध्ये यांनी सांगितले.



मंडल आयोगाच्या अंमलबजावणीला काँग्रेसचे त्यावेळचे अध्यक्ष राजीव गांधी यांनी ६ सप्टेंबर १९९० रोजी लोकसभेत केलेल्या भाषणात विरोध दर्शविला होता, याची आठवणही श्री. उपाध्ये यांनी यावेळी करून दिली. काँग्रेसच्या ओबीसी विरोधी इतिहासाचे वेगवेगळे दाखले देत श्री. उपाध्ये यांनी सांगितले की, १९५५ मध्ये ओबीसी समाजाच्या आरक्षणासाठी काका कालेलकर आयोगाची नियुक्ती करण्यात आली होती. या आयोगाचा अहवाल त्यावेळच्या काँग्रेस सरकारने मंत्रिमंडळ बैठकीपुढे आणलाच नाही. हा अहवाल धूळ खात कुजवत ठेवण्याचे पाप काँग्रेसने केले.

मंडल आयोगाबाबत काँग्रेसने याच पद्धतीचे राजकारण केले. मंडल आयोगाच्या शिफारशी इंदिरा गांधी आणि नंतर राजीव गांधी यांनी पंतप्रधान असताना कधीच अंमलात आणल्या नाहीत.

हे दोन्ही अहवाल कुजवत ठेवून काँग्रेसने आपण ओबीसींचे विरोधक आहोत हेच दाखवून दिले होते. त्यावेळी शरद पवार हे काँग्रेस मध्येच होते. त्यांनीही काँग्रेसचे ओबीसी विरोधी राजकारण मुकाटपणे सहन केले, असेही श्री. उपाध्ये यांनी नमूद केले.

भारतीय जनता पार्टीने सुरुवातीपासूनच ओबीसी समाजाच्या विकासाचा आग्रह धरला आहे. मंडल आयोगाची अंमलबजावणी भाजपाचा पाठिंबा असलेल्या व्ही. पी. सिंग सरकारने केली.

मोदी सरकारच्या काळातच ओबीसी आयोगाला संविधानिक दर्जा दिला गेला, असेही श्री. उपाध्ये यांनी निदर्शनास आणून दिले.

## जैन प्रकोष्ठाच्या निर्मितीने जैन समाजाला न्याय : रावसाहेब पाटील

**सांगली : हॅलो प्रभात**

भारतीय जनता पार्टी जैन प्रकोष्ठ आणि महाराष्ट्र जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने बार्शी येथे बैठक पार पडली. या बैठकीत भाजप जैन प्रकोष्ठचे राज्य उपाध्यक्ष रावसाहेब पाटील यांनी जैन प्रकोष्ठाच्या माध्यमातून जिल्हा व तालुका स्तरावर संघटनात्मक बळकटी आणता येईल. तसेच जैन समाजाच्या अडचणी एकत्र करून त्या शासन दरबारी प्रभावीपणे मांडता येतील, असे प्रतिपादन केले.

ते पुढे म्हणाले की, जैन समाजाची एकजूट निर्माण करण्यासाठी जैन प्रकोष्ठ हे व्यासपीठ महत्त्वाचे आहे. समाजाच्या शैक्षणिक,



सामाजिक व आर्थिक प्रश्नांवर उपाय शोधण्यासाठी हे प्रकोष्ठ पुढाकार घेणार आहे. संघटना मजबूत करण्यासाठी जिल्हा व तालुकास्तरावर समित्या लवकरच नेमण्यात येणार आहेत. याप्रसंगी महामंडळाचे अध्यक्ष ललितभाई गांधी यांनी महामंडळाच्या स्थापनेमागील उद्दिष्टेस्पष्टकेली. जैनसमाजाला शासनस्तरावर सर्वांगीण मदत मिळावी यासाठी हे महामंडळ स्थापन झाले आहे.

शिष्यवृत्ती योजनांद्वारे विद्यार्थ्यांना आधार, जैन समाजातील स्त्री-पुरुषांना उद्योगधंद्यासाठी भांडवल, जैन साधूंच्या विहारासाठी आणि निवासासाठी व्यवस्था तसेच शैक्षणिक संस्था स्थापन करण्यासाठी मदत अशा विविध योजनांचा लाभ जैन समाजाला मिळणार आहे. लवकरच जिल्हास्तरीय कार्यकारिणी स्थापन करून या योजना सर्वदूर पोहोचवल्या जातील, असे त्यांनी सांगितले.

बैठकीस प्रशांत गोंडाजी, सांगली जिल्हाध्यक्ष शितल पाटील, डॉ.ध्यानचंद्र पाटील, सुमतीलाल पुनीत, सुभाषजी लोढा, बाहुबली नगरकर, महेश बाफना, जयचंदजी पूर्णा आदी मान्यवर उपस्थित होते.

## वकिलांनी टेक्नो-सॅव्ही व्हावे : डॉ.हेरॉल्ड डिकोस्टा

**पुणे : हॅलो प्रभात**

डिजिटल युगात तंत्रज्ञानाने कायद्यापेक्षा वेगाने प्रगती केली असून त्याचा मोठा परिणाम तपासयंत्रणा आणि आंतरराष्ट्रीय सहकार्यावर झाला आहे. मागील दोन दशकांत सायबर गुन्ह्यांची हजारो प्रकरणे थेट सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहोचली आहेत. अशा परिस्थितीत परदेशी सर्व्हरवरून वेळेत ई-पुरावे मिळवणे, क्रिप्टो व्यवहारांवर नियंत्रण ठेवणे, क्युआर कोड फसवणूक टाळणे आणि न्यायव्यवस्थेत एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) चा योग्य वापर करणे या तातडीच्या गरजा आहेत. त्यामुळे अशी प्रकरणे हाताळण्यासाठी वकिलांनी टेक्नो-सॅव्ही होणे आवश्यक असल्याचे मत सायबर सिक्युरिटी कॉर्पोरेशनचे अध्यक्ष डॉ. हेरॉल्ड डिकोस्टा यांनी व्यक्त केले. ते एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी



विद्यापीठाच्या 'स्कूल ऑफ लॉ' तर्फे आयोजित आधुनिक काळातील कायदेशीर आव्हाने : वकील व कायदेतज्ज्ञांसमोरील शैक्षणिक दृष्टीकोन या एकदिवसीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. या वेळी बीव्हीजी इंडियाचे उपाध्यक्ष अमोल उमराणीकर, एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या प्रोव्होस्ट प्रा. डॉ. सायली गणकर, लोकमान्य टिळक लॉ कॉलेजच्या प्राचार्या डॉ. केतकी दळवी, डॉ. मोहिनी सुर्यवंशी, स्कूल ऑफ लॉचे प्रा. डॉ. गोविंद राजपाल आदी उपस्थित होते.

मुख्य भाषणात डॉ. डिकोस्टा पुढे म्हणाले, सध्या ई-मेल गैरवापर, क्युआर कोड व्यवहार फसवणूक, अनधिकृत संकेतस्थळांवरील अवैध विक्री, क्रिप्टो आणि केवायसीशी संबंधित गुन्ह्यांत वाढ झाली आहे. आर्थिक फसवणूक रोखण्यासाठी कायद्याची कठोर अंमलबजावणी गरजेची आहे. त्यासाठी कायदेशीर साक्षरतेसह वकील, पोलीस आणि विद्यार्थ्यांनी डिजिटल पुरावे मिळवण्याच्या पद्धती आणि सायबर फॉरेन्सिक्सचा अभ्यास करणे अत्यावश्यक आहे. यासोबतच तंत्रज्ञानाचा अतिरेकी वापर मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम करू शकतो; त्यामुळे त्यात संतुलन राखणेही गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले. एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या प्रोव्होस्ट डॉ. गणकर म्हणाल्या, एआय तंत्रज्ञान न्यायास मदत करेल; परंतु न्यायनिवाड्याचा आत्मा हा मानवी विवेकातच आहे. चर्चासत्राचे दुसरे सत्र 'सामाजिक बदलांसह घटनात्मक तत्त्वांचे संतुलन' या विषयावर पार पडले. यामध्ये महाराष्ट्र शासनाचे माजी अधिकारी डॉ. नागेश कुमार, अ‍ॅड. विभाकर रामतीर्थकर, डॉ. दीप्ती लेले, अ‍ॅड. विश्वास खराबे, अ‍ॅड. योगेश पवार, अ‍ॅड. मंगेश खराबे आदी तज्ज्ञांनी सहभाग घेतला. त्यांनी विद्यार्थ्यांना न्यायालयीन कामकाज व भारतीय घटनेतील बदलांचा अभ्यास करण्याचे महत्त्व पटवून दिले.

हॅलो प्रभात
# सांगली - कोल्हापूर
जिल्हा विशेष ■ मंगळवार, ०९ सप्टेंबर २०२५





## श्री.वेंकटेश्वरा पार्क सांस्कृतिक मंडळातर्फे महाप्रसाद संपन्न



**गांधीनगर : हॅलो प्रभात**

श्री वेंकटेश्वरा पार्क सांस्कृतिक मित्र मंडळ, गडमुडशिंगी (ता. करवीर) येथील नवसाला पावणारा, दगडूशेठ महागणपती,आरती व महाप्रसाद संपन्न झाला. गडमुडशिंगी गावचे नेतृत्व, उपसरपंच तानाजी पाटील यांच्या हस्ते आरती व महाप्रसादाला सुरुवात करण्यात आली. यावेळी आपल्या भाषणात त्यांनी उल्लेख केला की, मी सदैव या मंडळाच्या पाठीशी खंबीरपणे उपस्थित असेन, तसेच या भागाचा विकास व कायापालट केला जाईल, असे उपसरपंच तानाजी पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी मंडळाचे अध्यक्ष विद्यमान ग्रामपंचायत सदस्य व माजी सरपंच जितेंद्र यशवंत यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. या भागातील सर्व विकासकामांना सर्व सहकार्य करण्याचे आश्वासन जितेंद्र यशवंत यांनी दिले. यावेळी अंगणवाडी क्रमांक २५२/२५३ मधील मुलांना बसण्यासाठी चटई देण्यात आल्या. यावेळी मंडळाचे उपाध्यक्ष नजीर वाटंगी, सर्व सभासद बंधू उपस्थित होते. सूत्रसंचालन व निवेदन परशुराम देवडकर यांनी केले व कार्यक्रम मोठ्या उत्साहामध्ये संपन्न झाला.

## पेन्शनर्स असोसिएशनची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत



**विटा : हॅलो प्रभात**

येथील खानापूर तालुका पेन्शनर्स असोसिएशनच्या वतीने ३५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते. ही सर्वसाधारण सभा खेळीमेळीत पार पडली. येथील खानापूर पंचायत समितीच्या सभागृहामध्ये पार पडलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी सांगली जिल्हा पेन्शनर्स असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष व महाराष्ट्र राज्य संघटनेचे सचिव सुरेंद्र पेंडूरकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तर खानापूर तालुका पेन्शनर्स असोसिएशन तालुकाध्यक्ष प्रल्हाद धोंडीराम महाजन यांनी अध्यक्षस्थान भूषविले. यावेळी मागील वर्षाचा इतिवृत्तांत सचिव माजी मुख्याध्यापक विठ्ठल लोखंडे यांनी वाचून दाखविला व मागील वर्षीच्या खर्चास मान्यता देण्यात आली. यावेळी श्री.पेंडूरकर म्हणाले की, खानापूर तालुका पेन्शनर्स असोसिएशनचे कामकाज कौतुकास्पद आहे. सभासदांची संख्या वाढवून असोसिएशन बळकट केली पाहिजे. यावेळी स्वागत व प्रास्ताविक प्रल्हाद महाजन यांनी केले. सूत्रसंचालन कार्यवाह रघुराज मेटकरी यांनी केले तर मोहन देशमुख यांनी आभार मानले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व संचालक व पेन्शनर्स सभासद यांनी अथक परिश्रम घेतले.

## आरेवाडीत साकारतेय श्री बिरोबा देवराई



### साडेपाच एकरात २२ प्रजातींची शास्त्रशुद्ध लागवड

**ढालगांव : दत्तात्रय लोखंडे**

आरेवाडी येथील प्रसिद्ध बिरोबा देवालय बनामध्ये श्री.बिरोबा देवराई साकारत आहे. श्री. बिरोबा देवस्थान ट्रस्ट यांच्या पुढाकारातून साडेपाच एकर क्षेत्रात शास्त्रशुद्ध व नियमबद्ध पद्धतीने वृक्षारोपण करण्यात आले आहे. तासगाव-कवठेमहांकाळच्या सुमन पाटील यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. श्री बिरोबा देवस्थान हे महाराष्ट्रातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र असून येथे वर्षभरात लाखो भाविक येतात. यात्रेच्या काळात उन्हाळ्याच्या प्रखर तापमानात सावली मिळावी तसेच पर्यावरण पूरक उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या वृक्षारोपणात विविध प्रकारच्या २२ प्रजातींची ५ ते १० फूट उंचीची झाडे लावण्यात आली. सांगलीचे वनस्पती शास्त्रज्ञ डॉ.हर्षद दिवेकर यांनी मार्गदर्शन केले. त्यांच्या सल्लयानुसार खड्डयांचा आकार झाडामधील अंतर अन्नद्रव्ये याची काटकर अंमलबजावणी कोणत्या झाडाजवळ कोणते झाड लावावे याचे नियोजन करण्यात आले.

## प्राथमिक शिक्षक बँकेची वार्षिक सभा उत्साहात



**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

प्राथमिक शिक्षक बँकेची ८७ वी वार्षिक सभा यंदा खेळीमेळीच्या आणि उत्साही वातावरणात पार पडली. यावेळी कारभार पारदर्शक आणि नियोजनबद्ध पद्धतीने मांडण्यात आला. त्यामुळे सभासदांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. बँकेच्या सध्याच्या व्यवस्थापनाने कारभार पारदर्शकपणे आणि उत्तरदायित्वाने हाताळल्याचे सभासदांनी मान्य केले. मागील कार्यकाळात काही गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारी होत्या. परंतु यावेळी व्यवस्थापनाने आर्थिक शिस्त, शाश्वत योजना आणि उत्तम नियोजनामुळे सभासदांचा विश्वास जिंकला आहे. सभेत विरोधकांकडून काहीसा गोंधळ घालून सभा तहकूब करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, सभासदांनी त्याकडे दुर्लक्ष करत बँकेच्या चांगल्या कामगिरीवर भर दिला. बँकेची वाढ, कर्जवाटपातील पारदर्शकता आणि सभासदांना मिळणाऱ्या सेवा या विषयांवर समाधान व्यक्त करण्यात आले.बँकेच्या संचालक मंडळाने सभासदांचा विश्वास हीच खरी भांडवल ही भूमिका घेत कार्य केले असून, त्याचा परिपाक म्हणजे यंदाची सभा अत्यंत यशस्वी ठरली. यावेळी सर्व संचालक, सभासद उपस्थित होते.

# बोरगाव भूषण पुरस्कार विधायकतेला चालना देणारा : मानसिंगभाऊ नाईक

**बोरगाव : विक्रम देशमुख**



बोरगावभूषण पुरस्कार विधायकतेला चालना देणारा असून सामाजिक क्षेत्रात अधिक काम करण्याची ऊर्जा देणारा आहे,असे प्रतिपादन सांगली जिल्हा मध्यवर्ती सह.बँकेचे अध्यक्ष व माजी आमदार मानसिंगभाऊ नाईक यांनी केले.बोरगाव ता.वाळवा येथे गुरुवर्य एस.टी.पाटील भाऊ यांच्या संकल्पनेतून दिला जाणाऱ्या बोरगावभूषण पुरस्कार वितरण सोहळ्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. राजारामबापू कारखान्याचे अध्यक्ष प्रतिक पाटील, बँकेचे उपाध्यक्ष माणिक पाटील, डी आर सलगर, शिक्षण प्रसारक संस्थेचे उपाध्यक्ष उदयसिंह पाटील,संचालक सुरेशराव पाटील, संजय पाटील, अभिजीत पाटील, कारखान्याचे संचालक कार्तिक पाटील, मोहनराव शिंदे, तंटामुक्ती अध्यक्ष प्रमोद शिंदे, देवराज देशमुख यांच्यासह अन्य मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे मानसिंगराव नाईक म्हणाले, समाजासाठी आयुष्य वेचणाऱ्या गुणीजनांचा सन्मान केल्यास त्यांना बळ मिळते. काम करण्याची उमेद व उत्साह वाढतो. वैचारिकदृष्ट्या प्रगलभ बोरगावातील अनेक उपक्रम पथदर्शी आहेत.पुरस्कार विजेते जे.जी.पाटील यांनी साखर साखर कारखानदारीचे तांत्रिक प्रश्न मार्गी लावले. विविध कारखान्यांच्या गाळप क्षमता वृद्धिंगत केल्या. कारखान्यांचे दैनंदिन कामकाज सुरळीत ठेवले. डॉ.रविकुमार वाटेगावकर यांनी कर्करोग,निदान चिकित्सा व उपचारातून रुग्णांचे जगणे सुसह्य केले. वैद्यकीय क्षेत्रातील त्यांचे समर्पण व सेवाभावी वृत्ती आदर्शवत आहे.

राजारामबापू कारखान्याचे अध्यक्ष प्रतिकदादा पाटील म्हणाले,गुरुवर्य एस.टी. पाटील भाऊ व सहकाऱ्यांनी राबवलेला उपक्रम युवकांसाठी प्रेरणादायी आहे. जीवनाच्या प्रत्येक टप्प्यात अधिक चांगलं काम करण्यासाठी हा पुरस्कार उपयुक्त आहे.याप्रसंगी जे.जी. पाटील, डॉ.रविकुमार वाटेगावकर यांना मानसिंगभाऊंच्या हस्ते शाल,श्रीफळ, पुष्पगुच्छ व बोरगाव भूषण मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. कलारत्न पुरस्कार पुणे विजेते रणशिंगवादक मदन गुरव व तमाशा वगनाट्यलेखक मुरलीधर शिंदे, खो खो खेळाडू व प्रशिक्षक प्रकाश पाटील महेश सुतार यांना प्रतिकदादा पाटील यांच्याहस्ते सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी अरुण नाईक, सिकंदर मुल्ला, आनंदराव पाटील, जे.एस.पाटील, अशोकराव ह.पाटील, तात्यासो यादव, युवराज कांबळे, योगेश गायकवाड यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. माणिकराव पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. विनय देसाई,दत्तात्रय फसाले यांनी मानपत्राचे वाचन केले. प्राध्यापक के. बी. पाटील यांनी आभार मानले. पुरस्कार समितीचे सदस्य मानसिंग शिंदे यांच्यासह सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

## विद्यार्थ्यांच्या ज्ञानयात्रेस नवे बळ मिळेल : उत्तम पाटील

### नांदगाव शाळेला संगणक भेट

**शाहुवाडी : हॅलो प्रभात**



नांदगाव ( ता.शाहूवाडी) येथील विद्यामंदिर प्राथमिक शाळेस संगणक भेट देऊन शैक्षणिक विकासासाठी एक प्रेरणादायी पाऊल उचलण्यात आले. श्रीकृष्ण कला, क्रीडा व सांस्कृतिक मंडळ, नांदगाव आणि यशोनिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून तालुक्याचे शिक्षण विस्तार अधिकारी भगवान चौगुले व सोनुर्ले केंद्रप्रमुख शामराव पाटील उपस्थित होते.यावेळी यशोनिल फाऊंडेशनचे अध्यक्ष उत्तम पाटील म्हणाले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना संगणक शिक्षणाची सुविधा मिळणे ही काळाची गरज आहे. संगणकाच्या सहाय्याने विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख होईल. उच्च शिक्षण व स्पर्धात्मक परीक्षांत ते सक्षम होतील.

शिक्षण विस्तार अधिकारी भगवान चौगुले यांनी ग्रामीण शाळांना मिळणारी ही मदत म्हणजे शैक्षणिक विकासासाठी प्रेरणादायी पाऊल असल्याचे सांगितले. तर केंद्रप्रमुख शामराव पाटील यांनी संगणक भेटीमुळे शाळेच्या गुणवत्तेत भर पडेल व मुलांचे भविष्य उज्ज्वल होईल असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाला मुख्याध्यापक अशोक पाटील, मंडळाचे संस्थापक विठ्ठल पाटील, कार्याध्यक्ष बाजीराव पाटील, सामाजिक कार्यकर्ते तानाजी पाटील, अध्यक्ष प्रकाश पाटील, उपाध्यक्ष अभिजित पाटील, विक्रम पाटील, सागर पाटील, अमर पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक सौ. सोनाली पाटील यांनी केले. संयोजन अध्यापक अजित बंगे यांनी तर आभार तुकाराम पाटील यांनी मानले.

## विद्याताई मोरबाळे यांची मंडल अध्यक्षपदी निवड



**हुपरी : हॅलो प्रभात**

इचलकरंजी विधानसभा मतदारसंघाचे आ. डॉ. राहुल आवाडे यांच्या नेतृत्वाखाली विद्याताइ मोरबाळे यांची तेरा गावचे महिला मंडल अध्यक्षपदी निवड करण्यात आली. हुपरी, रेंदाळ, रांगोळी, यळगुड, जंगमवाडी, तळंदगे, पट्टणकोडोली, इंगळी, रूई, तिळवणी, साजणी, माणगाव, माणगाववाडी या गावी स्थापित करण्यात आलेल्या भाजप मंडल अध्यक्ष पदांच्या निवडीनंतर तेरा गावच्या अध्यक्षपदी विद्याताई मोरबाळे यांची निवड करण्यात आली या नियुक्तपत्राचे नियोजन प्रकाश आवाडे यांच्या ऑफिस मध्ये उत्साहात झाले.

# रमणलाल स्मृती फाउंडेशनचा विद्यार्थ्यांना आर्थिक आधार

**वारणानगर : हॅलो प्रभात**



येथे स्व.रमणभाई यांच्या ३७ व्या स्मृतिदिनानिमित्त दरवर्षीप्रमाणे याही वर्षी तात्यासाहेब कोरे अभियांत्रिकी महाविद्यालयातील सहा विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी रमणलाल स्मृती फाउंडेशनने अदा केली. शैक्षणिक शुल्क पोटी फाउंडेशनने १ लाख ६५ हजार इतकी रक्कम महाविद्यालयास अदा केली. लाभार्थ्यांमध्ये केमिकल इंजिनिअरिंगचे तीन, सिव्हिल इंजिनिअरिंगचे दोन व इलेक्ट्रॉनिक्स अँड टेली कम्युनिकेशन इंजीनिअरिंगचे एक असे एकूण सहा विद्यार्थी आहेत. मागील दोन वर्षांमध्ये १२ विद्यार्थ्यांना शैक्षणिक फी साठी मदत केली आहे.

स्व.तात्यासाहेब कोरे यांनी निर्माण केलेल्या ह्या विद्यानगरीतून शिक्षण घेऊन श्री.रोहन आणि सौ.पुनम यांनी वैयक्तिक आयुष्यामध्ये यशाचे शिखर गाठले असून, आपले वडील स्वर्गीय रमणलाल मणियार यांच्या स्मृतिप्रित्यर्थ फाऊंडेशन ची स्थापना करून समाजातील शिक्षण व आरोग्य क्षेत्रात विविध उपक्रम राबविले जातात. यातून समाजाप्रती प्रेम दिसून येते. वारणा शिक्षण मंडळ चे कार्यकारी अधिकारी डॉ.व्ही.व्ही. कारजिन्नी, अधिष्ठाता डॉ.एस एम पीसे, प्राचार्य डॉ. डी. एन. माने आणि सर्व इतर मान्यवर यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.महाविद्यालयाचे विद्यार्थी विकास विभागाचे सहयोगी अधिष्ठाता, प्रा.संपतराव मोरे यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले.

रमणलाल स्मृती फाउंडेशन चे संचालक, रोहन मणियार व सौ. पुनम साखरपे मणियार हे तात्यासाहेब कोरे अभियांत्रिकी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी असून त्यांनी २००१ मध्ये अनुक्रमे केमिकल व सिव्हील इंजिनिअरिंगची पदवी प्राप्त केली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील अभियांत्रिकी च्या गरजू विद्यार्थ्यांकरिता कॉलेज फी साठी आर्थिक सहयोग, गडहिंग्लज,आजरा व चंदगड तालुक्यातील इयत्ता नववी ते बारावीच्या गरजू विद्यार्थ्यांकरिता शैक्षणिक फी साठी आर्थिक सहयोग, प्रायमरी आणि सेकंडरी स्कूलच्या गरजू विद्यार्थ्यांकरिता शालेय सामग्रीचे वाटप इत्यादी उपक्रम फाउंडेशनच्या माध्यमातून राबवले जातात.

## क्रिकेट असोसिएशनच्या टूर्नामेंट कमिटीमध्ये निलेश शहा यांची वर्णी

**सांगली : हॅलो प्रभात**



महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या टूर्नामेंट कमिटी मध्ये निलेश शहा यांची महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या २०२५-२६ या वर्षात होणाऱ्या टूर्नामेंट कमिटी मध्ये सदस्य म्हणून निवड करण्यात आली , महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे खजिनदार संजय बजाज यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी निलेश शहा म्हणाले की, महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष रोहित पवार व महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे खजिनदार संजय बजाज तसेच महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे सीईओ अजिंक्य जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली मला काम करण्याची संधी मला मिळाली आहे. सांगली जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सचिव किशोर शहा व उपाध्यक्ष चंद्रकांत पवार यांचे ही मला कायम मार्गदर्शन असते, तसेच माझ्यावर जी जबाबदारी दिली आहे ती पूर्ण पाडण्याचा खेळाडूंना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न नेहमी असेल असे शहा म्हणाले.

## झिम्मा-फुगडी स्पर्धेत महालक्ष्मी संघाचा विजय

**शाहुवाडी : हॅलो प्रभात**

शाहूवाडी तालुक्यातील नांदगाव येथे गणेशोत्सवानिमित्त झिम्मा-फुगडी स्पर्धेचे रंगतदार आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत महालक्ष्मी महिला संघ, माजनाळ यांनी प्रथम क्रमांक पटकावून विजेतेपदाचा मान मिळवला. स्पर्धेत द्वितीय क्रमांक भागीरथी महिला गट, वाळोली यांनी तर तृतीय क्रमांक ज्योतिर्लिंग महिला गट, वाळोली यांनी मिळवला. चतुर्थ क्रमांक जिजाऊ महिला गट, चव्हाणवाडी आणि पाचवा क्रमांक हिरकणी महिला गट, नणुंद्रे यांनी पटकावला. एकूण बारा संघांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमात सहभागी सर्व महिला भगिनींना यशोनिल फाऊंडेशन पुणे तर्फे संसारोपयोगी साहित्य भेट देण्यात आले. उत्तम पाटील व सुजाता पाटील यांचे या उपक्रमासाठी मोलाचे योगदान लाभले.

## स्वत:च्या अस्तित्वाची जाणीव करुन देणारा 'शरद पॅटर्न' : अनिल बागणे



**यड्राव : हॅलो प्रभात**

'विद्यार्थ्यांना स्वत:च्या अस्तीत्वाची जाणीव करुन देणारा पॅटर्न म्हणजे 'शरद पॅटर्न' आहे. यामध्ये शिक्षण, उद्योगाची धडे तर दिले जातातच त्याआधी संस्काराची धडे दिली जातत. जीवनात यशस्वी होण्यासाठी प्रचंड व सातत्याने कष्ट केले पाहिजे. त्यासोबत नम्रपणा अंगिकार करावे, असे प्रतिपादन शरद इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजीचे एक्झिक्युटीव्ह डायरेक्टर अनिल बागणे यांनी केले. ते यड्राव येथील शरद इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये प्रथम वर्ष विद्यार्थीच्या स्वागत समारंभात बोलत होते.

श्री. बागणे पुढे म्हणाले, 'विद्यार्थी केंद्रबिंदू ठेवून हि संस्था वाटचाल करीत आहे म्हणूनच अत्यल्प काळात यशस्वी झाली आहे. विद्यार्थ्यांना तंत्रज्ञान, औद्योगिक पूरक कौशल्ये शिकविण्याबरोबरच महाविद्यालय इंडस्ट्रीयल ट्रेनिंग, इंटर्नशीप, प्रोजेक्ट बेस्ड लर्निंग, स्टार्टअप सेंटर, अॅक्टीव्हिटी प्रोग्रॅम, प्रोडक्शन सेंटर, इनोव्हेशन सेंटर, युजी फेलोशिप याच्यासोबत व्हॅप अंतर्गत २८ प्रकारचे अद्यावत कौशल्ये उपलब्ध आहेत. ज्याचा उपयोग स्वत:चा उद्योग उभारण्यासाठी, चांगल्या कंपनीत नोकरी व जीवनात यशस्वी बनण्यासाठी होत आहे. दरम्यान महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. बाहुबली संगमे यांनी महाविद्यालयाची माहिती दिली.

यावेळी प्रवेश घेतलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी सर्व डिन, विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक व विद्यार्थी उपस्थीत होते. स्वागत प्रथमवर्ष विभाग प्रमुख डॉ. साळुंखे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. अपूर्वा बापट, प्रा.कल्याणी जोशी यांनी केले. आभार प्रा.पल्लवी पाटील यानी मानले.

# सांगलीत १३ सप्टेंबर रोजी विकासयात्रींचा स्नेहमेळावा

**सांगली : हॅलो प्रभात**

सांगली जिल्हा परिषदेत उपमुख्यकार्यकारी अधिकारी म्हणून उत्कृष्ट काम केलेले यशदा पुणेचे उपमहासंचालक डॉ.मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या 'मी विकासयात्री' या पुस्तकाचे नुकतेच प्रकाशन झाले. या पुस्तकात त्यांनी संतगाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान, निर्मलग्राम अभियान व पर्यावरण संतुलित समृध्द गाव योजनेत काम करीत असताना सांगली जिल्ह्यात केलेल्या कामाचा विशेष उल्लेख केलेला आहे.

या पुस्तकात या विविध योजनांची कामे करीत असताना त्याकाळात या कार्यात सहभागी असणाऱ्या अनेक लोकांचा त्यांनी कृतज्ञतापूर्वक उल्लेख केलेला आहे. सांगली जिल्ह्यातील शाश्वत विकासाच्या चळवळीत कार्यरत असलेल्या विकासयात्रींचा स्नेहमेळावा शनिवार दि. १३ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता सांगली येथील गणेशनगर येथील स्विमिंग टँकजवळ असणाऱ्या रोटरी क्लब ऑफ सांगलीच्या सभागृहात आयोजित करण्यात आला आहे.





स्नेहमेळाव्यासाठी प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून 'मी विकासयात्री' या पुस्तकाचे लेखक आणि यशदा पुणेचे उपमहासंचालक डॉ.मल्लिनाथ कलशेट्टी उपस्थित राहणार आहेत. स्नेह मेळाव्याचे अध्यक्षस्थान शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रो.डॉ. माणिकराव साळुंखे भूषवणार असून कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे व पाणी फाऊंडेशन, प्रोग्रॅम डायरेक्टर-गव्हर्मेंट रिलेशनचे मा.नामदेव ननावरे उपस्थिती राहणार आहेत. स्नेहमेळाव्यात डॉ. मल्लीनाथ कलशेट्टी यांचा सत्कार माजी कुलगुरू डॉ.माणिकराव साळुंखे यांच्या हस्ते होणार आहे. स्नेहमेळाव्यात शाश्वत विकासाच्या चळवळीत कार्यरत असणाऱ्या विकासयात्रींच्या सोबत संवाद होणार आहे. या स्नेहमेळाव्यास सांगली जिल्ह्यात त्याकाळात कार्यरत असणारे पंचायत राज व्यवस्थेतील सरपंच, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सभापती, जिल्हा परिषद पदाधिकारी, गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी, ग्रामसेवक, महिला व बाल कल्याण, शिक्षण, आरोग्य, कृषी, समाजकल्याण या विभागातील कार्यरत असणारे पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन अँड.बाबासाहेब मुळीक व शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे माजी कार्यक्रम समन्वयक प्रा.संजय ठिगळे यांनी केले आहे.

हॅलो प्रभात
# अहिल्यानगर
जिल्हा विशेष ■ मंगळवार, ०९ सप्टेंबर २०२५





# शिक्षकच भारताचा खरा शिल्पकार : डॉ.सर्जेराव निमसे

**कोपरगाव : हॅलो प्रभात**

पूर्वीपेक्षा आजची शिक्षण व्यवस्था चांगली असली तरी शिक्षकांनी आपल्या पेशाची प्रतिष्ठा जपली पाहिजे. शिक्षकच विद्यार्थ्यांमध्ये बौद्धिक कुतूहल निर्माण करून त्यांना योग्य मार्गदर्शन करत असतो.

भारताची शिक्षण पद्धती जगात उच्च प्रकारची आहे.विकसित होण्याचा मार्ग शिक्षण व्यवस्थेतूनच जात असतो. आदर्श शिक्षक हाच असतो जो विद्यार्थ्यांना आदर्श घडवतो. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये व्यवसायाबद्दल अभिमान निर्माण करण्याचे कार्य शिक्षकच करत असतात. आज ए.आय.चे युग आले असेल तरी मानवी मूल्ये शिक्षकच जपू शकतात, अशा शब्दांत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

**समता सहकार सभागृहात शिक्षक सन्मान सोहळा संपन्न**



समता चॅरिटेबल ट्रस्ट व कोपरगाव जेष्ठ नागरिक सेवा मंच यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक दिनानिमित्त आयोजित शिक्षक सन्मान सोहळा समता पतसंस्थेच्या समता सहकार सभागृहात मोठ्या उत्साहात पार पडला. त्या वेळी ते बोलत होते .या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समता नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे होते.

शिक्षक हा समाजाचा खरा शिल्पकार आहे. पालक मुलांना जन्म देतात, पण त्यांना संस्कार, ज्ञान व जगण्याची दिशा देण्याचे काम शिक्षक करतात. म्हणूनच शिक्षकांचे समाजात स्थान अतुलनीय आहे असे उद्गार अध्यक्षीय मनोगतातून काका कोयटे यांनी काढले.

कार्यक्रमाला जेष्ठ नागरिक सेवा मंचाचे अध्यक्ष सौ. सुधाभाभी ठोळे, उपाध्यक्ष दत्तात्रय कंगले, कार्याध्यक्ष विजय बंब, सचिव उत्तमभाई शहा, आश्विन व्यास, लेखिका शैलेजा रोहोम यांच्यासह मोठ्या संख्येने शिक्षक व शिक्षिका उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन समता इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य समीर अत्तार यांनी केले.

या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी समताचे कोपरगाव शाखाधिकारी योगेश मोरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. उपस्थितांचे आभार समता पतसंस्थेचे ठेव विभाग प्रमुख संजय पारखे यांनी मानले.

# ॲड.प्रकाश संसारे यांना राज्यस्तरीय पुरस्कार


**राहुरी : हॅलो प्रभात**



पुणे येथील ज्ञानमाता सेवाभावी संस्थेतर्फे दिला जाणारा राज्यस्तरीय पुरस्कार ॲड. प्रकाश संसारे यांना जाहीर करण्यात आला आहे. संसारे हे अहमदनगर जिल्ह्यात मागील २७ वर्षापासून कायद्याच्या क्षेत्रात कार्यरत असून गरीब आणि न्यायासाठी धडपड करणाऱ्या गरजूंना ते न्याय मिळवून देण्यासाठी कार्यरत आहेत. त्यामुळे त्यांना 'गरीबांचे व गरजूंमधील लोकांचे वकील' म्हणून ओळखले जाते. त्यांनी अनेक गुंतागुंतीचे आणि महत्त्वाचे कायदेशीर खटले हाताळले आहेत. ते नोटरी पब्लिक असून, नोटरी पब्लिकच्या माध्यमातूनही ते गरजू लोकांना मदत करून समाजसेवा करीत आहेत. संस्थेचे अध्यक्ष अब्राहम आढाव यांनी निवडीचे पत्र प्रकाश संसारे यांना नुकतेच दिले आहे. निवड पत्रात म्हटले आहे की, माहिती अधिकार नागरिक समूह आयोजित तिसऱ्या राज्यस्तरीय अधिवेशन प्रसंगी, राज्यस्तरीय पुरस्कारासाठी आपली निवड करण्यात आलेली आहे. सदर प्रसंगी आपल्यास सन्मानचिन्ह व मानपत्र प्रदान करून गौरविण्यात येणार आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष अब्राहम आढाव यांनी दिली.

# ग्राहकांना दिलासा तर व्यापाराला मिळणार नवी गती : मुकेश अंबानी

**मुंबई : हॅलो प्रभात**



रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडचे चेअरमन व व्यवस्थापकीय संचालक मुकेश डी. अंबानी यांनी भारत सरकारने वस्तू व सेवा कर दरांमध्ये केलेल्या दुसऱ्या पिढीतील सुधारणा स्वागतार्ह असल्याचे सांगितले. अंबानी यांनी या ऐतिहासिक सुधारणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून भारतीयांसाठी दिलेले दिवाळी गिफ्ट असल्याचे म्हटले.

ते म्हणाले, जीएसटी सुधारणा या ग्राहकांसाठी उत्पादने व सेवा अधिक किफायतशीर करण्याच्या, व्यापारातील गुंतागुंत कमी करण्याच्या, महागाईवर नियंत्रण ठेवण्याच्या आणि किरकोळ क्षेत्रातील उपभोग वाढविण्याच्या दिशेने एक प्रगतिशील पाऊल आहे. यामुळे भारताच्या आर्थिक वृद्धीला वेग मिळेल. या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत जीडीपी वृद्धी दर ७.८% इतका झाला आहे आणि नव्या सुधारणा अर्थव्यवस्थेला आणखी गती देऊन वृद्धीदर दोन अंकी आकड्याच्या जवळ नेऊ शकतात.

# टाळ - मृदुंगाच्या गजरात गणरायाला साश्रुनयनांनी निरोप

**दौंड : हॅलो प्रभात**

दौंड तालुक्यातील विविध भागात गणरायाला भावपूर्ण निरोप घेऊन विसर्जन करण्यात आले. सकाळपासून विविध मंडळांनी नियोजित वेळेत जवळ असणाऱ्या नदी, तलाव, विहीर ह्या ठिकाणी बाप्पाला विसर्जित केले. तालुक्यातील कानगाव येथे गेल्या दहा दिवसापासून विराजमान झालेल्या बाप्पाला शनिवारी साश्रुनयनांनी निरोप देण्यात आला. तालुक्यात विसर्जन शांततेत झाले असून कुठलीही अनुचित घटना घडली नाही.



सालाबादप्रमाणे बाप्पा विराजमान झाल्याने गणेशोत्सव काळात अत्यंत आनंद आणि मंगलमय वातावरण निर्माण झाले होते. लहान मुलांना तर पर्वणीच असते. कानगाव येथील श्री भैरवनाथ मित्र मंडळ व मुंजाबा तरुण मंडळांचे वैशिष्ट्य म्हणजे टाळ मृदुंगाच्या तालात पारंपरिक पद्धतीने बाप्पाची गावातून मिरवणूक काढण्यात आली. ग्रामप्रदक्षिणा झाल्यानंतर भीमा नदी काठी आरती व त्यानंतर विसर्जन करुन प्रसाद वाटप करण्यात आला. यावेळी चंद्रकांत जाधव, मयूर कोराळे, सनी कोराळे, अविनाश साळुंखे, संकेत जाधव, ओंकार जाधव व सर्व ग्रामस्थ गणेश विसर्जन मिरवणुकीत सहभागी झाले होते.

### यवत पोलिसांचे उत्कृष्ट नियोजन

गणेश विसर्जन मिरवणुकीत यंदा पोलिस प्रशासनाच्या उत्कृष्ट नियोजनामुळे मिरवणूक शिस्तबद्ध, सुरक्षित व सुरळीत पार पडली. यवत पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नारायण देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण पोलिस पथकाने अतिशय शिस्तबद्ध व काटेकोर बंदोबस्त ठेवून मिरवणूक कोणत्याही अडथळ्याविना संपन्न केली. मिरवणुकीत सर्व मंडळांचा उत्स्फूर्त सहभाग होता. विशेष म्हणजे पोलिसांच्या सुयोग्य नियोजनामुळे वातावरणात उत्साह, आनंद व ऐतिहासिक शिस्त दिसून आली.

# शारदानगरच्या गणरायाला जल्लोषात निरोप



**कोपरगाव : हॅलो प्रभात**

शहरातील शारदानगर येथील गणरायाला मोठ्या भक्ती भावाने ढोल ताशाचा गजरात शनिवारी निरोप देण्यात आला तर या प्रसंगी गेली १० दिवस मुलं मुली महिला तसेच पुरुषांसाठी आयोजित केलेल्या संगीत खुर्ची, लिंबू चमचा, खेळ पैठणीचा, चित्रकला, जेष्ठ नागरिकांसाठी स्पर्धा आदी खेळामधील विजेत्यांना राज्य पत्रकार संघाचे तालुका सचिव विजय कापसे व पत्रकार सुनिल ससाणे यांच्या हस्ते भेट वस्तू देऊन गौरविण्यात आले. हा सर्व गणेशोत्सव सोहळा यशस्वीतेसाठी ह.भ.प अण्णासाहेब शिंदे महाराज, डॉ.कुणाल घायतडकर ,दिग्विजय शेळके ,संतोष आहेर, सुनील काळे, अशोक नरोडे, बाबुराव कुटे,रमेश भालेराव, मनोज लोहाटे, प्रितम जाधव, विशाल वराडे,एकनाथ चावण, सुभाष वैद्य, नितेश काळे, संजय कोल्हे,नितेश काळे, महेश पेटकर, आप्पासाहेब मोरे,प्रकाश पाटील, तात्या पवार,सोपानराव जपे, दिग्विजय शेळके आदींनी अथक परिश्रम घेतले तर याप्रसंगी डॉ घायतडकर यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

# एस.एस.जी.एम.महाविद्यालयात 'शिक्षक दिन' उत्साहात

**कोपरगाव : हॅलो प्रभात**

रयत शिक्षण संस्थेचे श्री सद्गुरू गंगागीर महाराज सायन्स, गौतम आर्ट्स अँड संजीवनी कॉमर्स कॉलेज कोपरगाव येथे शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ०५ सप्टेंबर या दिवशी भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती संपूर्ण देशामध्ये मोठ्या उत्साहाने ' शिक्षक दिन' म्हणून साजरा करण्यात येते. हे औचित्य साधून महाविद्यालयातील विद्यार्थींनी वसतीगृहाच्या वतीने शिक्षक दिन साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.माधव सरोदे यांच्या शुभहस्ते व प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत झाले. याप्रसंगी मा. प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर सेवक यांचा गुलाब पुष्प देऊन वसतिगृहाच्या विद्यार्थिनींनी सन्मान केला.



शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थिनींना शुभ संदेश देताना प्राचार्य डॉ.माधव सरोदे म्हणाले की, देशाचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे शिक्षणातील तात्विक योगदान महत्त्वपूर्ण असून त्यांचा आदर्श घेऊन शिक्षकांनी समाजाला उन्नती कडे नेण्याचे कार्य करावे.

तसेच मानवी जीवनामधील शिक्षकांचे महत्व अधोरेखित करून शिक्षक हा ज्ञान देणारा नव्हे तर विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा मार्गदर्शक व प्रेरणास्थान आहे, असे प्रतिपादित केले. सदर प्रसंगी वसतिगृहाच्या कु.आश्विनी शिंदे व कु.भूमिका येवले या विद्यार्थिनी आपली मनोगते व्यक्त केली. यावेळी प्रा.गहिनीनाथ जाधव कार्यालयीन सेवक सतीश जाधव, दिलीप दुशिंग व महाविद्यालयीन सेवक, वसतीगृहातील विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विज्ञान विभागाचे उपप्राचार्य डॉ. घनश्याम भगत यांनी केले. तर आभार डॉ. भागवत देवकाते मानले.

# विजेच्या प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी विवेक यांची अधिकाऱ्यांशी चर्चा



**कोपरगाव : हॅलो प्रभात**

कोपरगाव मतदारसंघातील विजेच्या तातडीच्या प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता संगमनेर प्रदीप वट्टमवार व शहर विभागाचे उपकार्यकारी अभियंता धनंजय धांडे यांनी कोल्हे कारखाना अध्यक्ष विवेक कोल्हे यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीत कोपरगाव मतदारसंघातील विविध गावांमध्ये तसेच शहर विभागात वारंवार खंडित होणारी वीज, कमी दाबाचा पुरवठा आणि नवीन ट्रान्सफॉर्मरची आवश्यकता या महत्त्वाच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा झाली. कोल्हे यांनी स्थानिक नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणींवर प्रकाश टाकत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. यावर कार्यकारी अभियंता वट्टमवार व उपअभियंता धांडे यांनी समस्यांचे गांभीर्य लक्षात घेतले असून, आवश्यक तांत्रिक उपाययोजना आखून लवकरच सकारात्मक बदल घडवून आणण्याचे आश्वासन दिले. त्यांनी वीज वितरण यंत्रणेचे आधुनिकीकरण, तांत्रिक दुरुस्ती तसेच आवश्यक ठिकाणी नवीन ट्रान्सफॉर्मर व तारांबाबत तातडीने पावले उचलली जातील असे सांगितले. या चर्चेमुळे कोपरगाव मतदारसंघातील विजेच्या प्रश्नांवर लवकरच ठोस तोडगा निघेल अशी अपेक्षा व्यक्त होत असून, नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. विवेक कोल्हे यांनी अधिकाऱ्यांचे आभार मानून लोकांच्या हितासाठी सातत्याने प्रयत्नशील राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

# भारतीय संविधानातच देश एकात्म ठेवण्याचे सामर्थ्य : सत्येंद्र तेलतुंबडे

**नेवासा : हॅलो प्रभात**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बनवलेल्या संविधानातच भारत देश एकात्म ठेवण्याचे सामर्थ्य आहे, असे प्रतिपादन बुद्धिस्ट सेमिनरीचे मुख्य समन्वयक व अभ्यासक सत्येंद्र तेलतुंबडे यांनी केले. ते भदंत धम्मसिरी यांनी वर्षावास अधिष्ठान निमित्त आयोजित केलेल्या ङ्गसंविधान उद्देशिकाङ्ग अभियानात सातवे पुष्प गुंफताना सुरेशनगर येथे बोलत होते. अध्यक्षस्थान भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष भगवान दळवी यांनी भूषविले. प्रास्ताविक सूत्र संचालन ज्येष्ठ बौद्धाचार्य बी.बी.पंडित यांनी करून महासभेचे जिल्हाकोषाध्यक्ष नानासाहेब बनकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.



श्री.तेलतुंबडे पुढे म्हणाले की, १३ डिसेंबर १९४६ ला प्रथम पंडित नेहरू यांनी संविधान सभेपुढे राज्यघटनेचा आराखडा मांडला. त्यावर साधक बाधक चर्चा होऊन ही प्रस्ताविका तयार करण्यात आली. ४२ व्या घटनादुरुस्तीने त्यामध्ये समाजवादी व धर्मनिरपेक्ष संकल्पनेचा समावेश करण्यात आला. या संकल्पना नवीन नसून संविधानाच्या गाभ्यातच समाविष्ट असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने ही शिक्कामोर्तब केलेले आहे असे शेवटी त्यांनी प्रतिपादन केले. याप्रसंगी रिपाइंचे सर्वआयु. संजय बनसोडे, सुरेश गायकवाड , भाऊसाहेब जगदाळे,नितीन भालेराव,निखिल साळवे,कांचन फलटणकर,सयाजी वाघमारे,वाकडे नंदु,सागर हिवाळे आदी उपस्थित होते. शेवटी नेवासा तालुक्यात धम्माचा प्रचार व प्रसार कसा करावा यावर सकारात्मक चर्चा केली.

# नवीन जीएसटी निर्णयाचे विवेक कोल्हे यांनी केले स्वागत

**कोपरगांव : हॅलो प्रभात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीच्या धोरणातून व केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जीएसटी परिषदेत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. जीएसटीतील १२ व २८ टक्के स्लॅब रद्द करून फक्त ५ व १८ टक्के हेच स्लॅब ठेवण्यात आले आहेत.

या ऐतिहासिक निर्णयामुळे सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळणार असून २२ सप्टेंबर २०२५ पासून हा निर्णय लागू झाल्यानंतर अनेक वस्तू स्वस्त होणार आहेत.कृषी क्षेत्राला बऱ्याच अंशी मदत या निर्णयामुळे होणार असल्याचे दिसून येते.



या निर्णयाचे स्वागत करताना कोल्हे साखर कारखान्याचे अध्यक्ष व विवेक कोल्हे म्हणाले की, सण-उत्सवाच्या पार्श्वभूमीवर आलेला हा निर्णय सर्वांसाठी आनंददायक ठरणार आहे. दैनंदिन वापराच्या वस्तूंवरील करकपातेमुळे महागाईवर नियंत्रण येईल आणि कुटुंबांचा आर्थिक ताण हलका होईल. किराणा सामान, कपडे, घरगुती उपकरणे यावरचा करकपात सर्वसामान्यांना थेट दिलासा देणार आहे. सरकारने कृषी क्षेत्रावर लक्ष केंद्रित करून शेतकऱ्यांना मोठी भेट दिली आहे. आता ट्रॅक्टरचे टायर आणि सुट्या भागांवरील जीएसटी १८% वरून ५ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला आहे. आता ट्रॅक्टरवर १२% ऐवजी फक्त ५% कर आकारला जाईल शेतीचा खर्च कमी होईल आणि शेतकऱ्यांना थेट फायदा होईल. शेतकरी, व्यापारी, कामगार, विद्यार्थी अशा सर्व घटकांना या निर्णयाचा थेट किंवा अप्रत्यक्ष लाभ होईल, असे मत कोल्हे यांनी व्यक्त केले. सर्वसामान्यांच्या हिताचा विचार करून घेतलेल्या या निर्णयाबद्दल त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे अभिनंदन केले. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकारही या निर्णयाचा लाभ जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचवेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी डी.वाय.पाटील ग्रुप कटिबद्ध

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

४१ वर्षाची उज्वल परंपरा असलेल्या डी वाय पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश घेऊन विद्यार्थ्यांनी आपल्या उत्तम करिअरचा राजमार्ग निवडला आहे. विद्यार्थ्यांचे उज्वल भविष्य घडविण्यासाठी डी. वाय. पाटील ग्रुप कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन डी वाय पाटील ग्रुपचे विश्वस्त माजी आमदार ऋतुराज संजय पाटील यांनी केले. महाविद्यालयात प्रथम वर्षासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभात पाटील बोलत होते. डी. वाय. पाटील ग्रुपचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

**ऋतुराज पाटील ; महाविद्यालयात प्रथम वर्ष विद्यार्थ्यांचे स्वागत**



कसबा बावडा येथील डी. वाय. पाटील स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांचा 'ओरिएन्टेशन' समारंभ उत्साहात संपन्न झाला. डी. वाय. पाटील ग्रुपचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला विश्वस्त माजी आमदार ऋतुराज संजय पाटील, कार्यकारी संचालक डॉ. ए. के. गुप्ता, प्राचार्य डॉ. संतोषकुमार चेडे, रजिस्ट्रार डॉ. एल. व्ही मालदे, ॲडमिशन प्रमुख प्रा. रविंद्र बेन्नी आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

ऋतुराज संजय पाटील यांनी डी. वाय. पाटील ग्रुपवर विश्वास दाखवणाऱ्या विद्यार्थी व पालकांचे अभिनंदन केले. ते म्हणाले, पद्मश्री डॉ.डी.वाय.पाटील यांनी १९८४ मध्ये सुरु केलेले हे ग्रुपचे पहिले महविद्यालय असून आज ग्रुपचा महाराष्ट्रभर विस्तार आहे. एकाच नावाने ८ विद्यापीठे, १५ अभियांत्रिकी महाविद्यालये असलेला हा पहिलाच ग्रुप असावा. अनेक माजी विद्यार्थी आज देश विदेशात उच्च पदावर काम करतात याचा अभिमान वाटतो. कार्यकारी संचालक डॉ.गुप्ता यांनी संपूर्ण वर्षाचा अभ्यासक्रम, परीक्षा यांच्या नियोजनाची माहिती प्रेझेन्टेशनद्वारे दिली. ते म्हणाले, अभियांत्रिकी महविद्यालयाने उत्तम प्लेसमेंट रेकॉर्ड असून यावर्षी ५१५ हून अधिक विद्यार्थ्यांना प्लेसमेंट मिळाली आहे. आपल्या पाल्यावर चांगले पैलू पाडून चार वर्षानंतर किमती हिऱ्यात त्याचे रुपांतर होईल यासाठी आम्ही प्रयत्न करू.

यावेळी श्रीलेखा साटम, डॉ. जे.ए.खोत, प्राचार्य डॉ.महादेव नरके, डॉ.अजित पाटील, डॉ.अभिजित माने, प्रा. नवनीत सांगळे यांच्यासह विविध प्राचार्य, विभागप्रमुख प्राध्यापक विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

# अदिती सांगळेचे सीईटी परीक्षेत यश

**राहुरी : हॅलो प्रभात**



राहुरी तालुक्यातील जोगेश्वरी आखाडा येथील अदिती विलास सांगळे यांनी महाराष्ट्र राज्य विद्यापीठ पात्रता परीक्षेत कॉमर्स विषयात १९२ गुण मिळवत यश संपादन केले आहे. त्यांच्या या उत्तुंग यशामुळे गावासह तालुक्याचा अभिमान वाढला आहे. येथील धुमाळ महाविद्यालयात ११ वी पासून एम.कॉम पर्यंतचे शिक्षण त्यांनी घेतले. सातत्यपूर्ण अभ्यास, चिकाटी आणि प्रामाणिकपणे मेहनत घेण्याची वृत्ती यामुळे त्यांनी राज्यस्तरीय या महत्त्वपूर्ण परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवले. या यशामागे अदिती यांना पालकांचे मार्गदर्शन, प्राध्यापकांचे सातत्यपूर्ण सहकार्य तसेच कुटुंबीयांचे प्रोत्साहन लाभले. त्यामुळेच कठोर परिश्रमासोबत योग्य दिशेने अभ्यास करण्याची संधी मिळाली, असे सांगितले.